**निगमित संप्रेषण एवं निवेशक संबंध**

प्रधान कार्यालय : लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे - 5

टेली -020 :25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 495

वृत्तपत्रीय निवेदन

**बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे रायगड जिल्ह्यातील महाड येथे पुरआपत्तीग्रस्त नागरिकांना मदतीचा हात**

पुणे २८ जुलै २०२१ **:** देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील आघाडीची बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने रायगड जिल्ह्यात महाड तालुक्यातील पूरग्रस्त नागरिकांना जीवनावश्यक वस्तुचे वाटप केले. पुणे येथील बँकेच्या मुख्यालयातील संसाधन नियोजन विभागाचे सरव्यवस्थापक श्री विजय कांबळे, एकीकृत जोखिम व्यवस्थापन विभागाचे सरव्यवस्थापक श्री अरुण कबाडे व बँकेच्या नवी मुंबई विभागाचे क्षेत्रीय व्यवस्थापक श्री सुरेंद्र देवकर आणि इतर उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांन्री रायगड जिल्ह्यातील खरवली, बिरवाड़ी आणि तळीये या महाड तालुक्यातील पुर व दरळआपत्तीग्रस्त गावांना भेट दिली. पूरग्रस्त नागरिकांना अन्न पदार्थ, चादरी, टॉवेल, ब्लँकेट इत्यादी मुलभूत व जीवनावश्यक वस्तु वाटप कार्यक्रमास रायगड जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती ज्ञानदा फणसे उपस्थित होत्या. श्री विजय कांबळे व श्री अरुण कबाडे यांनी पूरग्रस्त नागरिकांशी संवाद साधला व त्यांच्या परिस्थितिचा आढावा घेतला.

श्रीमती ज्ञानदा फणसे व पूरग्रस्त भागातील अन्य नागरिकांनी बँक ऑफ महाराष्ट्र व त्यांच्या अधिकाऱ्यांनी घेतलेल्या परिश्रमांची प्रशंसा करून त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. .

एक सामाजिक कर्तव्याचा (सीएसआर) भाग म्हणून बँक ऑफ महाराष्ट्रने मदत साहित्याचे वाटप महाराष्ट्रातील रायगढ़ जिल्ह्यात केली. आपत्तीग्रस्त नागरिकांच्या हितासाठी बँक ऑफ महाराष्ट्र आपले प्रयत्न यापुढेही सुद्धा सुरूच ठेवेल.